# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 January 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- भारतीय समुदायाच्या जगभरातल्या उत्तम कामगिरीचा देशाला अभिमान – पंतप्रधानांचं प्रतिपादन, राष्ट्रपतींच्या उपस्थितीत आज प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचा समारोप
- नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून आतापर्यंत ५३५ कोटींहून अधिकची मदत वितरीत
- वस्तू आणि सेवा कर संरचनेत सुधारणा करण्याची काँग्रेस नेते सचिन पायलट यांची मागणी
- तीन ते १५ फेब्रुवारी दरम्यान राज्यातल्या सर्व कारागृहांमध्ये निःक्षय शिबिराचं आयोजन

आणि

- कन्या भ्रूण हत्येच्या प्रतिबंधासाठी नागरिकांनी पुढे यावं – छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांचं आवाहन

****

भारतीय समुदाय जगभर उत्तम कामगिरी करत असून देशाला त्याचा अभिमान असल्याचे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले आहेत. ओडिशात भुवनेश्वर इथं अठराव्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचं उद्घाटन काल पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

***साल 1947 में भारत को आजादी मिली। उसमें एक बडा रोल हमारे डायस्पोरा का भी रहा है। उन्होंने विदेशों मे रहकर भारत की आजादी के लिये कॉन्ट्रीब्युट किया। अब हमारे सामने 2047 का टार्गेट है। हमें***

***भारत को विकसित देश– एक डेव्हलप नेशन बनाना है। आप आज भी भारत की ग्रोथ मे शानदार कॉन्ट्रीब्युशन कर रहे है। और विकसित भारत की जर्नी को और ताकद दे सकते है। आपका हर प्रयास भारत को मजबूत करेगा।''***

दरम्यान, प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचा आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या परदेशी भारतीयांना 'राष्ट्रपती प्रवासी भारतीय सन्मान' आज प्रदान करण्यात येणार आहे. 'परदेशस्थ भारतीयांचं विकसित भारतासाठी योगदान', ही यंदाच्या या तीन दिवसीय संमेलनाची संकल्पना आहे.

****

राज्यातल्या ४२३ शहरांमधल्या नागरिकांचं जीवनमान उंचावण्यासाठी सर्व अत्यावश्यक आणि दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करून, सर्वांगीण विकासाचं उद्दिष्ट ठेवण्याचे निर्देश, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. येत्या शंभर दिवसात करण्याची कामं आणि आराखड्याच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी काल विविध विभागांच्या बैठका घेतल्या, त्यावेळी ते बोलत होते. औद्योगिक विकास महामंडळाकडच्या जागांच्या वाटपाची प्रक्रिया येत्या १०० दिवसात पूर्ण करावी, तसंच उद्योग विषयक धोरणांमध्ये कालानुरूप बदल करण्यासंदर्भात तातडीनं आराखडा तयार करण्याची सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या संतोष देशमुख हत्या प्रकरणात जे दोषी असतील, त्यांच्याविरोधात पक्ष वगैरे न पाहता कारवाई केली जाईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. ते काल पुण्यात पत्रकारांशी बोलत होते. मुख्यमंत्र्यांनीही या प्रकरणातल्या दोषींवर कडक कारवाईची भूमिका घेतल्याचं पवार यांनी सांगितलं. ते म्हणाले…

***"आज एसआयटीची चौकशी चालुये, आज सीआयडीची चौकशी चालुये. राज्यातल्या मुख्यमंत्र्यांनी सांगितलेलं आहे की, जो कोणी दोषी असेल, ते सिद्ध झालं, तर त्यांच्यावर ताबडतोब कारवाई केली जाईल. मी देखील देवेंद्रजींना भेटून सांगितलेलं आहे, की यासंदर्भामध्ये पक्ष वगैरे न बघता, कुणाची गय करण्याचं कारण नाही.''***

****

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने पाच लाख ३० हजार ४५ शेतकऱ्यांना ५३५ कोटी ६५ लाख ७४ हजार रुपयांची मदत वितरित केली आहे. मदतीची ही रक्कम थेट आपदग्रस्त लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली असल्याची माहिती, मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव–पाटील यांनी दिली. यामध्ये छत्रपती संभाजीनगर विभागात लातूर जिल्ह्यातल्या एक लाख ६८ हजार ८९ शेतकऱ्यांना १७८ कोटी ६५ लाख  रुपये, परभणी जिल्ह्यातल्या एक लाख १२ हजार ६४८ शेतकऱ्यांना १२१ कोटी ६४ लाख,  बीड जिल्ह्यातल्या ३९ हजार ९३ शेतकऱ्यांना ३० कोटी २२ लाख, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या तीन हजार ६१९ शेतकऱ्यांना ३ कोटी २३ लाख, हिंगोली जिल्ह्यातल्या दोन हजार ४०८ शेतकऱ्यांना एक कोटी ६३ लाख, नांदेड जिल्ह्यातल्या एक हजार ८८६ शेतकऱ्यांना १ कोटी ५८ लाख, जालना जिल्ह्यातल्या एक हजार ५९० शेतकऱ्यांना १ कोटी ५७ लाख, तर धाराशिव जिल्ह्यातल्या ३४२ शेतकऱ्यांना ३२ लाख ५० हजार रुपये वितरीत करण्यात आले आहेत.

****

वस्तू आणि सेवा कर– जीएसटीच्या करसंरचनेत सुधारणा करण्याची मागणी काँग्रेस नेते सचिन पायलट यांनी केली आहे. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. बेरोजगारी, महागाई, आदी मुद्यांवरून टीका करत, केंद्र सरकारने येत्या अर्थसंकल्पात जीएसटीमध्ये बदल करत, जीएसटी दोन लागू करावा, असं पायलट यांनी नमूद केलं. ते म्हणाले..

> ***‘‘अब समय आ गया है की सरकार को जीएसटी 2.0 लाना चाहिये। हमारी मांग है केंद्र सरकार से, वित्तमंत्री महोदया से। क्योंकी अब दो – तीन हफ्तों के अंदर बजेट पेश होगा। हम लोग चाहते है की इसको नॅशनलाईज किया जाये, और अगर कोई ऐसा टॅक्टिकल ये सरकार लेकर आती है, उसका समर्थन करने के लिये तैयार है।’’***

****

महाविकास आघाडी सरकारच्या काळातल्या विधान परिषदेत राज्यपाल निर्देशित बारा आमदारांच्या नियुक्तीच्या शिफारशीची यादी शिंदे सरकारनं मागे घेतली होती, याविरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कोल्हापूरचे नेते सुनील मोदी यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. ही याचिका मुंबई उच्च न्यायालयाने

फेटाळून लावली आहे. या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याची भूमिका मोदी यांनी व्यक्त केली.

****

येत्या तीन ते १५ फेब्रुवारी दरम्यान राज्यातल्या सर्व कारागृहांमध्ये निःक्षय शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. देशभरात सुरू असलेल्या क्षयरोग निर्मूलन अभियानासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र लिहून, सर्व कारागृहं तसंच सुधारगृहांमध्ये १०० दिवसांच्या या अभियानाचं आयोजन करण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, या अभियानांतर्गत काल नांदेड इथं क्ष-किरण यंत्र वाहनाचं, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते लोकार्पण झालं, तर लातूर इथं जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते क्षयरुग्णांना पोषण आहाराचं वितरण करण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या गर्भलिंग चाचण्या आणि त्यानंतर होणाऱ्या कन्या भ्रूण हत्येस आळा घालण्यासाठी नागरिकांनी पुढे येण्याचं आवाहन, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे. काल यासंदर्भातल्या बैठकीनंतर ते बोलत होते. जिल्ह्यात फिरत्या वाहनांमध्ये गर्भलिंग निदान चाचण्या करणाऱ्या अनधिकृत व्यक्ती वावरत असल्याचं प्रशासनाच्या निदर्शनास आलं असून, त्याबाबत कडक उपाययोजना करण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. नागरिकांना यासंबंधी काही माहिती मिळाली तर १८ ०० २३३ ४४ ७५ या नि:शुल्क क्रमांकावर माहिती द्यावी, माहिती देणाऱ्याचं नाव गोपनीय ठेवलं जाणार असून, संबंधितांना पारितोषिक दिलं जाणार असल्याचं स्वामी यांनी सांगितलं. ते म्हणाले...

> ***''गर्भलिंग तपासणी याची कायद्यान्वये बंदी घातलेली आहे. अशा प्रकारचं केल्याचं निदर्शनास आल्यास शिक्षा होऊ शकते. मी समस्त नागरिकांना विनम्र आवाहन करतो, की आपणाला जर अशा पद्धतीने कोणत्या ठिकाणी गर्भलिंगनिदान तपासणी होत असल्याचं निदर्शनास आल्यास टोल फ्री क्रमांकावर आपण संपर्क साधावा. किंवा जिल्ह्यातील, प्रशासनातील कुठल्याही वरीष्ठ अधिकाऱ्यांना आपण याबद्दलची माहिती दिली, तर आपलं नाव गोपनीय राखलं जाईल. आणि त्या घटनेची सत्यता पडताळल्यानंतर आपल्याला रोख स्वरूपामध्ये इनाम सुद्धा दिलं जाईल.''***

****

लॉयन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर चिकलठाणाच्या वतीने पद्मश्री डॉ. शरद कुमार दीक्षित यांच्या स्मरणार्थ मोफत प्लास्टिक सर्जरी शिबीराला आजपासून प्रारंभ होत आहे. महात्मा गांधी मिशन आणि केमिस्टस् ॲन्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या सहकार्यातून आयोजित केलेल्या या शिबीरात आज सकाळी लॉयन्स नेत्र रूग्णालयात रुग्ण नोंदणी आणि तपासणी होईल. तर उद्यापासून १४ जानेवारीपर्यंत एम. जी. एम. रुग्णालयात शस्त्रक्रिया होणार आहेत.

****

हिंगोली जिल्ह्याच्या ग्रामपंचायत निवडणुकीनंतर खर्च सादर न करणाऱ्या एक हजार पंचेचाळीस जणांना पाच वर्षांसाठी निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवण्यात आलं आहे. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी याबाबतचे आदेश जारी केले. २०२१ मध्ये पाचशे त्रेसष्ठ ग्रामपंचायतींच्या निवडणुका लढवणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा ताळेबंद सादर न केल्यानं ही कारवाई करण्यात आली.

****

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक दोन अंतर्गत परभणी जिल्ह्यात तीन प्रकल्प मंजूर असून प्रत्येक प्रकल्पात दोन, अशी एकूण सहा गावांची निवड करण्यात आली आहे. परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी ही माहिती दिली. यामध्ये गंगाखेड तालुक्यातल्या पडेगाव, बनपिंपळा, बेलवाडी आणि घटांग्रा तसंच जिंतूर तालुक्यातल्या सावंगी म्हाळसा आणि माणकेश्वर, या गावांचा समावेश आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानापोटी २५ टक्के अग्रीम विम्याचा प्रस्ताव राज्य सरकारला सादर करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना हा हक्काचा २५ टक्के अग्रीम विमा मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असून, येत्या महिन्याभरात शेतकरी बांधवांच्या खात्यात सुमारे २५० कोटी रुपये जमा होतील, असं आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितलं.

****

शाकंभरी नवरात्र महोत्सवात काल तुळजाभवानी देवीची विशेष मुरली अलंकार महापूजा करण्यात आली. यासंदर्भातल्या आख्यायिकेनुसार, तुळजाभवानी मातेनं

दैत्याचा वध केल्यानंतर श्रीकृष्णाने आपली मुरली देवीस अर्पण केली, त्याची आठवण म्हणून मुरली अलंकार महापूजा मांडली जाते.

✲✲✲✲